# नागदरवाडी गावातील महिला व पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम

**प्रा. सोनाली बळीराम वाखरडे** [१]
सहाय्यक प्राध्यापक,
समाजशास्त्र विभाग,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**डॉ. घनःश्याम येळणे** [२]
सहयोगी प्राध्यापक,
समाजिकशास्त्रे संकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

**शोधनिबंधाचा गोषवारा**

महाराष्ट्रातील दुष्काळ निवारणासाठी पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम एक प्रभावी साधन म्हणुन राबविले जात आहे. हा कार्यक्रम लोकसहभागातून राबविला जातो. यात महिलांचेही महत्वपूर्ण योगदान आहे. गावातील पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाच्या यशामध्ये महिलांच्या सहभागाची मदत झाली. पण यातून महिलांना काय साध्य झाले? ज्या भागाला सतत पाणी टंचाई व दुष्काळाचा सामना करावा लागतो त्या भागातील स्त्रियांना आयुष्यभर पाण्यासाठी वणवण भटकावे लागते. पितृसत्ताक व्यवस्थेने पिण्याच्या व घरगुती वापरासाठीच्या पाण्याची जबाबदारी स्त्रियांवर सोपवलेली आहे. पण पाण्याचे मालकी हक्क त्यांना कधीही मिळाले नाहीत. या शोधनिबंधातून नांदेड जिल्ह्यातील नागदरवाडी गावातील पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाच्या यशाचा आढावा घेतला आहे. तसेच जलसंधारण कार्यक्रमातील स्त्रियांचा सहभाग व यातून झालेल्या लाभांचे मूल्यमापन केले आहे.

**प्रस्तावना –**

महाराष्ट्रातील मराठवाडा विभाग हा कोरडवाहू भाग म्हणुन ओळखला जातो. मागील काही वर्षापासून या भागाला सतत पाणी टंचाई व दुष्काळाचा सामना करावा लागत आहे. तसे पाहिले तर मराठवाड्यातील दुष्काळ हा मानवनिर्मित आहे. दुष्काळामुळे ग्रामीण गरीब लोकांचे जीवन होरपळून निघाले आहे. अशा या भागातील दुष्काळावर मात करण्यासाठी शासन नेहमी अल्पकालीन उपाययोजनावर भर देतो. जसे की, मराठवाड्यात दरवर्षी पाणी टंचाई दूर करण्यासाठी टॅकरने पाणी पुरवठा केला जातो. दुष्काळग्रस्त भागाला टॅकरने पाणी पुरवणे हा काही पूरेसा व योग्य उपाय नाही. दुष्काळ निवारणासाठी ठोस पावले उचलणे आवश्यक असतात. पावसाळ्यात पडणाऱ्या पावसाचे योग्य व्यवस्थापन न केल्यामुळे मराठवाड्यातील बहुतांश भागात पाणी टंचाईची समस्या जाणवते. 'Scarcity of water has arisen mainly due to scanty rainfall, lack of conservation of rain water, excessive use of water in crop irrigation and maximum withdrawal of groundwater without equivalent recharge of water.' (Narwani 2005) मराठवाड्यात दरवर्षी चांगला पाऊस पडतो. पण पडणाऱ्या पावसाचे संवर्धन केले जात नाही. पावसाळ्यात पडलेला पाऊस वाहून जातो आणि उन्हाळ्यापर्यंत भू–पृष्ठावरील पाण्याचे बाष्पीभवन होऊन नदी, नाले व तलाव कोरडे पडतात. पाणी जमिनीत मूरविण्याच्या योग्य पद्धतीचा अवलंब न केल्यामुळे पावसाळ्यात पूर परिस्थिती निर्माण होते आणि उन्हाळ्यात पाणी टंचाई जाणवते.

आपल्या वर्तमान काळात भेडसावणाऱ्या समस्यांसाठी भूतकाळाला कारणीभूत ठरवायचे आणि त्या समस्येवर भविष्यकाळ उपाय शोधेल या आशेने वर्तमान काळात समस्येकडे निष्क्रिय व तटस्थपणे बघण्याची एक मानसिकता लोकांमध्ये रूजलेली असते. समस्येसाठी भूतकाळाला कारणीभूत मानून दोष देण्यापेक्षा व भविष्यकाळावर अवलंबून न राहता वर्तमान कृतीला महत्व देऊन त्यात परिवर्तन घडवून आणणे गरजेचे असते. हाच विकासाचा खरा मार्ग असतो. दुष्काळ निवारणासाठी जलसंधारण कार्यक्रम एक प्रभावी साधन आहे. पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाच्या माध्यामातून गावागावात जलसंधारण कार्यक्रम राबविले जात आहेत. 'A watershed (or catchment) is a geographic area that drains to a common point, which makes it an attractive unit for technical efforts to conserve soil and maximize the utilization of

surface and subsurface water for crop production.'(Kerr et.al. 2002) हा कार्यक्रम केवळ पाणीटंचाईवर मात करत नाही तर एकात्मिक ग्रामीण विकासावर भर देतो.

**शोधनिबंधाचे महत्व –**

मराठवाड्यात मागील काही वर्षात पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम हाती घेतले गेले. या कार्यक्रमांचा मुख्य हेतू पर्यावरण संरक्षण जरी असला तरी या कार्यक्रमांच्या माध्यामातून स्थानिक समूदायांना सबळ करण्यावर भर दिला गेला आहे. पर्यावरण व नैसर्गिक संसाधनांना पूनर्जिवित करण्यासाठीचा हा एकात्मिक विकास कार्यक्रम आहे. नांदेड जिल्ह्यातील नागदरवाडीतील गावकऱ्यांनी आपल्या पाण्याची गरज ओळखून एकत्रितपणे काम करण्याचे ठरविले. या गावातील लोकांनी पाण्यासाठी मोठी चळवळ उभी केली. गावात १९९९ ते २००३ या पाच वर्षात पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम राबविण्यात आला. नांदेड जिल्ह्यातील नागदरवाडी गावातील पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाच्या यशाचा आढावा या शोधनिबंधातून घेतला आहे. त्याचबरोबर या कार्यक्रमातील स्त्रियाचा सहभागही अभ्यासला आहे. कारण पितृसत्ताक व्यवस्थेत पिण्याच्या व घरगुती वापरासाठीच्या पाणी व्यवस्थापनाची जबाबदारी स्त्रियांवरच सोपवलेली असल्याने स्त्रियांना आयुष्यभर पाण्यासाठी वणवण भटकावे लागते. त्यामुळे स्त्रिया या कार्यक्रमात सहभागी झाल्या.

**शोधनिबंधाचे उदिदृष्ट –**

१. पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाचे महत्व स्पष्ट करणे.
२. पाणी समस्या, स्त्रिया व ग्रामीण विकास प्रक्रिया यांचा अभ्यास करणे.
३. पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमातील महिलांचे योगदान समजुन घेणे.
४. पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाच्या लाभांचे मूल्यमापन करणे.

**नागदरवाडीतील महिला व पाणीटंचाईची समस्या –**

नांदेड जिल्ह्यातील लोहा तालुक्यात नागरवाडी हे गाव वसलेल आहे. नांदेड जिल्हा मुख्यालयापासून ५५ कि.मी. तर लोहा तालुक्यापासून १५ कि. मी. अंतरावर हे गाव आहे. हे गाव माळाकोळी ग्रामपंचायती अंतर्गत येते. माळरानात वसलेलं हे गाव शासकीय योजनांपासून वंचित आहे. दरवर्षी चांगला पाऊस पडूनही गावात तीव्र पाणीटंचाई जाणवत होती. गावात पिण्यासाठी पाणी नव्हते म्हणून लोकांना शेजारच्या रमनेवाडी गावातून पाणी आणावे लागत असे. गावातील महिलांना दररोज ३ किमी चालत जाऊन डोंगर चढून रमनेवाडीहून पाणी आणावे लागत होते. अर्ध्या रस्त्यात थांबून थोडी विश्रांती घेऊन पून्हा पाण्याचे भांडे डोक्यावर उचलून आणत असत. उन्हाळ्यात विहिरीचे पाणी खोल जात असल्याने गाळाचेच पाणी पिण्यासाठी वापरत असत. आंघोळीला तर पाणी मिळणे अवघड होते. रात्रीसुद्धा पाणी भरावे लागत होते. गावात टॅंकर आले की होणारी भांडणे, विहीरीत पडून झालेला अपघात अशा रोजच्या जगण्याच्या अनुभवातून आपला पाण्याचा प्रश्न किती गंभीर आहे याची जाणीव लोकांना होवू लागली म्हणून पाण्यासाठी काहीतरी करण्याचे गावाने ठरविले.

गावातील सरपंच बाबूराव केंद्रे म्हणाले की, गावातील लोकांची पाण्यासाठीची वणवण आजुबाजुच्या सर्व गावाना माहित होती. त्यामुळे गावातील मुलांना लग्नासाठी कोणीही मुलगी द्यायला तयार नव्हते. दुष्काळी गावात मुलगी दिली तर तिलाही आयुष्यभर पाण्यासाठी वणवण भटकावे लागेल या भितीने कोणीही गावात मुलगी देत नव्हते, उलट गावातील मुलगी लग्न करून नेण्यासाठी तयार होते, कारण गावातील मुलगी ही कष्टाळू म्हणून ओळखली जायची.

गावातील तरुण मुलींनाही पाणी भरावे लागत असल्यामुळे त्यांचा पूर्ण दिवस पाणी भरण्यातच जात होता व त्यामुळे त्यांना शिकायलाही मिळाले नाही. पाण्याच्या वणवणीमुळे महिलांमध्ये अशक्तपणा, पाठ, मान व डोकेदुखी हे तर रोजचेच त्रास बनले होते. पाणी डोक्यावरून वाहून वाहून मुलीं व महिलांच्या डोक्यावरचे केस गळून टक्कल पडले आहे. डोक्यावरचे टक्कल हे त्यांच्या सामाजिक व्यक्तीत्वाचा भाग बनले होते. नागदरवाडीतील महिलांच्या डोक्यावरचे टक्कल हे कष्टाळूपणाची निशाणी म्हणून त्यांच्या सामाजिक, आर्थिक शोषणांचे एक प्रतिक बनले होते.

एकंदरित गावाने आपल्या पाण्याची गरज ओळखून एकत्रितपणे काम करण्याचे ठरविले. गावाने पाण्यासाठी मोठी चळवळ उभी केली. पाणी प्रश्नावर मात करण्यासाठी एकजूट झाले. आपल्यासारखे आपल्या मुलांचही आयुष्य पाण्याच्या वणवणीत निघून जाईल या भितीने पाण्यासाठी काहीतरी करण्यासाठी प्रेरित झाले. गावातील बाबुराव केंद्रे यांनी सामाजिक कार्याचं प्रशिक्षण घेतलेले होते. त्यांनी लोकांना एकत्र करून गावाचा विकास करण्याचे ठरविले. बिलोली तालुक्यातील एक सेवाभावी संस्था 'संस्कृती संवर्धन मंडळ' यांच्या मदतीने गावात पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम राबविण्याचे ठरविले. संस्कृती संवर्धन मंडळाचे अध्यक्ष प्रमोद देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामसभेने गावात इंडो जर्मन पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाला मंजुरी दिली. सर्वांनी या कामात हातभार लावण्याचे ठरविले. या संस्थेने नाबार्ड व अहमदनगरच्या वॉटरशेड ऑर्गनाइझेशन ट्रस्टच्या सहकार्याने हा प्रकल्प राबविण्याचे ठरविले. नाबार्डचे ८०% आर्थिक सहकार्य व २०% आर्थिक योगदान ग्रामस्थांच्या श्रमदानातून करण्याचे ठरविले. नागदरवाडीत कार्यक्रमाच्या यशस्वीयतेसाठी संस्कृती संवर्धन मंडळ या संस्थेने सहभागी दृष्टिकोनाचा वापर केला. पाणलोट कार्यक्रमाला ग्रामस्थांच्या कौशल्याचा व ज्ञानाचा वापर करून कार्यक्रमाची उपयुक्तता व क्षमता वाढवायची होती. ग्रामस्थांनीही सामाईक हेतूसाठी सर्व जबाबदारी सामुदायिकपणे उचलली. गावात विठ्ठल रूक्मिणी पाणलोट समिती नेमली त्यात ३०% जागांवर महिलांना प्राधान्य देण्यात आले. स्त्रियांच पिण्याच्या व घरगुती पाणी वापराच्या व्यवस्थापक असल्याने त्यांना या कार्यक्रमात पुढाकार देण्यात आला.

**नागदरवाडीतील पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम व महिलांचा सहभाग —**

गावात १९९९ साली जलसंधारण कार्यक्रम सुरू करण्यात आला. पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाच्या पहिल्या टप्प्यापासून म्हणजेच सहभागी ग्रामीण मूल्यमापन (Participatory Rural Appraisal) या पासून कार्यक्रमाची सुरूवात झाली. गावाबद्दलची पार्श्वभूमी सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास करून आवश्यक ती माहिती मिळवता आली. विविध प्रशिक्षण कार्यक्रम, क्षमता बांधणी, व्यक्तीमत्व विकास यापासून कार्यक्रमाची सुरूवात केली. कार्यक्रमात जास्तीत जास्त महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी वेगवेगळे प्रशिक्षण शिबीरे चालविली. Indo-German watershed development project tried to give equal priority to women's development. It tried to strengthen women's participation in decision making, and financial security by wages and forming Self help groups. (D'souza, M. 1998) भजनी मंडळाच्या माध्यामातून महिलांना प्रेरित केले. गावात संस्कृती संवर्धन मंडळाने तरुणींसाठी किशोरी वर्ग चालविले, त्यातून मुलींना शिवणकामाचे प्रशिक्षण दिले. गावात एकूण ५ बचत गटांची स्थापना केली. या बचतगटाच्या माध्यमातून गावातील विविध प्रश्नांवर चर्चा केली.

कार्यक्रमाचा आराखडा तयार करण्यासाठी लागणारे पूर्व सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर, गावकऱ्यांच्या संमतीने प्रकल्पाच्या कामाला सुरूवात झाली. नागदरवाडीच्या डोंगरात पायथा ते माथा पडणाऱ्या पावसाच्या पाण्याच्या प्रत्येक थेंबाथेंबाचा वापर करण्याचा निश्चय केला २००० साली २०० हेक्टर जमिनीवर पावसाचे पाणी अडवून जमिनीत मुरविण्यासाठी सीसीटी बनविले. गावपरिसरात लाकूड बंदी, चराई बंदी आदेश लागू केला. दुसऱ्या वर्षी पुन्हा २०० हेक्टर जमिनीवर काम करण्यात आले. असे एकूण १०१४ हेक्टर जमिनीवर हा कार्यक्रम राबविण्यात आला. गावालगतच्या सामाईक जमिनीवर व गावकऱ्यांच्या जमिनीवर हा कार्यक्रम राबविला. त्यात जलसंधारणाच्या विविध पद्धतींचा वापर केला गेला. सीसीटी, बांध, बंधारे, चेकडॅम, मातीबांध, नालाबंडिग, नाला सरळीकरण या पद्धती वापरल्या. 'Watershed development is a technical intervention that works by capturing scarce rainwater and improving the management of soil and vegetation. Rainwater is trapped and harvested with ridge to valley bases in order to make water available year round to all the people living in a particular area.' (Pandit 2010) या सर्व कार्यक्रमात महिलाही समान सहभागी

होत्या. महिलांनी सर्व श्रमात पुरूषाच्या बरोबरीने काम केले. त्या मोबदल्यात महिलांना समान वेतनही मिळाले. पाणलोटमध्ये काम करताना महिलांना बऱ्याच अडचणींना सामोरे जावे लागले. महिलांनी सांगितले की, घरकामाच्या जबाबदाऱ्या सांभाळून पाणलोटच्या कामाला जावे लागत असे पण कामाचे महत्व व भविष्यतील फायदे लक्षात घेवून आम्ही सर्व जबाबदारी स्विकारून पाणलोटमध्ये आपले संपूर्ण योगदान दिले.

पाणलोट कार्यक्रमाच्या निमित्ताने महिलांना सार्वजनिक क्षेत्रात काम करण्याची संधी मिळाली. पाणलोट समितीतून महिला ग्रम विकासातील निर्णय प्रक्रियेत सहभागी होवू लागल्या. बचतगटाच्या माध्यमातून आणि ग्रामसभेतून सार्वजनिक क्षेत्रात प्रवेश करता आला. पितृसत्ताक व्यवस्थेत सार्वजनिक क्षेत्र (Public sphere) हे फक्त पुरूषांच्या मालकीचे मानले जाते, तेथे आज स्त्रिया पाणलोटच्या माध्यमातून गावच्या सार्वजनिक जीवनाचा भाग बनल्या आहेत. हा त्यांच्या जीवनात झालेला मोठा बदल आहे. गावातील महिलांनी आपला अनुभव सांगताना म्हटले की, पूर्वी महिला घराबाहेर फक्त महिला भजनी मंडळ, पाणवठे इ. ठिकाणीच दिसत होत्या. आता गावातील प्रौढ शाळा, शेतीविषयक शिबीर, रोजगार मेळावा, ग्रामवैदू मेळावा, बचत गट अशा विविध कार्यक्रमात महिला आपली उपस्थिती नोंदवितात.

गावकऱ्यांना विशेषत: मुलींना व महिलांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकावे लागत नाही. आज गावात पूरेसा पाणी पुरवठा होत आहे. केवळ पाच वर्षात नाबार्डकडून मिळालेल्या अनुदानाच्या सहाय्याने व संस्कृती संवर्धन मंडळाच्या मदतीने गाव बदलले आहे.

**माती आहे म्हणून शेती आहे,**

**पाणी आहे म्हणून जीवन आहे.**

या ब्रीद वाक्याने नागदरवाडी हे गाव एक आदर्श मॉडल बनले आहे. नागरवाडीच्या यशाची दखल अमीर खान यांच्या प्रसिद्ध 'सत्यमेव जयते' या दुरदर्शनवर प्रसारित झालेल्या मालिकेने घेतली. या मालिकेच्या पाणी प्रश्नावरील भागात नागदरवाडीचे त्यावेळेचे युवानेते बाबुराव केंद्रे मुलाखतीसाठी उपस्थित होते. तेथे त्यांनी जलसाक्षरतेमुळे गावात झालेला कायापालट आणि यशाचे वर्णन केले. आज राज्यभरातून अनेक लोक नागरवाडीच्या पाहणीसाठी व अभ्यास दौऱ्यासाठी येतात. नागरवाडी गावाचा आदर्श घेवून शेजारील गावेही जलसंधारणासाठी प्रेरित झाली आहेत. बाबुराव केंद्रेनी दिलेल्या माहितीनुसार पाच वर्षात गावपरिसरात हजारो झाडांची लागवड झाली. मृत ओहळ, नाले जीवंत झाले आहे. १०१४ हेक्टर क्षेत्रफळावर हा प्रकल्प राबविला. पाणलोटमुळे शेतीला पाणी मिळाले. शेतीत दुबार पीक घेणे शक्य झाले. गावातील पडिक जमिन लागवडीखाली आली. शेतीचे उत्पादन वाढले, जनावरांना चारा मिळाल्यामुळे दुधाळ जनावरांची संख्या वाढली व दुग्धव्यवसायात वाढ झाली. सर्व विहिरींना भरपूर पाणी आहे. विकासाच्या झिरपा सिद्धांताप्रमाणे पाणलोट कार्यक्रमाचा लाभ शेतजमिन धारकांबरोबरच अल्पभूधारक, भूमिहिन शेतमजूर व स्त्रिया या सर्वांना झाला. गावातील प्रत्येकाला कुटुंब चालविण्यासाठी पैसा मिळाला व गावातून होणारे स्थलांतर थांबले. शेतीसाठी मजूराची मागणी वाढली त्यामुळे आज गावातच रोजगारही मिळू लागला आहे. पाणलोट कार्यक्रमावेळी महिलांना रोजगार व समान वेतन मिळाले होते. पाणलोटच्या कामातून मिळालेला पैसा महिलांनी बचत गटामध्ये गुंतविला. त्यातून त्या आर्थिक व्यवहार करायला शिकल्या. गावातील महिला आपले अनुभव सांगतांना म्हणतात की, 'पाणलोटमुळे गावात पाणीही आले आणि पैसाही आला, आज आम्हाला पाणलोटमुळे पाण्याच्या त्रासापासून सुटका झाली, आरामही भेटला, आणि वेळही वाचला. पण आता आमच्या वेळेचा व श्रमाचा आणखी चांगला उपयोग कसा करता येईल याचे आम्हाला ज्ञान नाही. आमच्याकडे श्रम आहे पण पैसा आणि ज्ञान नाही'. महिलांना स्व—विकासासाठी काहीतरी करण्याची इच्छा आहे. त्यांना शिकायला मिळाले नाही याची खंत वाटते पण त्या आपल्या मुलींना शिक्षणासाठी प्रोत्साहन देत आहेत. पाणलोटमुळे महिलांमध्ये आत्मविश्वास व विकासाची जाणीव निर्माण झाली आहे. महिलांची पाणी ही प्राथमिक गरज पूर्ण झाली आहे. त्यामुळे आता त्या त्यांच्या निर्णायक गरजांकडे वळत आहेत. पुरेसे व स्वच्छ पाणी मिळाल्यामुळे कामाचा ताण कमी झाला, पाण्याची भटकंती थांबली रोजगार मिळाला, त्यांच्या जीवनाला एक दिशा मिळाली आहे.

महिलांच्या समूहाने पिण्याच्या पाणी पुरवठ्याची योजना हाती घेतली होती. बचतगटाकडे या योजनेची देखरेख करण्याचे काम सोपवले गेले. विहीर खोदणे, मोटारपंप बसवणे, वीज पुरवठा पाईपलाईन, पाणीसाठवण टाकी, अंतर्गत पाईप अशा विविध कामासाठी कर्ज मिळाले. महिला बचतगटांनी पुढाकार घेऊन ही योजना सुरू केली. विशेष बाब म्हणजे महिलांकडून ही योजना चालविण्यात येत आहे. प्रत्येक घराकडून १५ रू दर महिना देखरेख खर्च घेण्याचे ठरविले.

गावात आजही शासनाच्या योजना पोहचत नाहीत. गावात अजूनही शौचालये बांधलेली नाहीत. पाणलोट क्षेत्र कार्यक्रम राबविलेल्या गावात शौचालय बांधणे अत्यावश्यक असते. कारण उघड्यावरच्या शौचामुळे भुपुष्ठभागावरचे पाणी दुषित होते आणि आरोग्य धोक्यात येते. गावातील महिला याबाबत संकोच व्यक्त करतात. गावातील मुलांना शिक्षणासाठी जवळ असलेल्या माळाकोळी गावातील शाळेत जावे लागते. त्यामुळे मुलींचे शिक्षणातील गळतीचे प्रमाण अधिक आहे.

**नागदरवाडीतील पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाच्या लाभांचे मूल्यमापन –**

आज गावकऱ्यांनी लोकसहभागातून गावाचे चित्र बदलून टाकले आहे. पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाने केवळ पाणीटंचाईवर मात केली नाही तर एकात्मिक ग्रामीण विकासावर भर दिला आहे. आज महिलांना आपण केलेल्या कामाचा अभिमान वाटतो. शाश्वत विकासासाठी पर्यावरणीय, सामाजिक व आर्थिक बदल घडून आणणे आवश्यक असते. त्यासाठी हा कार्यक्रम एक प्रभावी माध्यम म्हणून वापरले गेले. पण पारंपारिक स्तरीकृत समाजरचना व समाजातील जाती, लिंगावर आधारित विषमता पूर्णपणे नष्ट करण्याची अपेक्षा या कार्यक्रमाकडून करता येणार नाही. ‘Problems remain regarding equity, by their nature, areas, development programmes offer benefits to landowners, with landless people benefiting indirectly, either through peripheral programme activities or trickle down effects. In fact, watershed projects can actually make women and landless people worse off by restricting their access to resources that contribute to their livelihoods.’(Kerr, J. et al. 2002: X) स्त्रियांना आपल्या क्षमता सिद्ध करण्याचे एक व्यासपीठ मिळाले. जिथे महिलांनी कार्यक्रम यशस्वी करून दाखविला त्याचबरोबर आपल्या शारिरिक, बौद्धिक क्षमतांचे दर्शन घडविले. पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमातून पर्यावरणीय विकास साधता आला परंतू स्त्रियांच्या सामाजिक, आर्थिक विकासासाठी हा कार्यक्रम अपूरा पडतो. ‘Gender perspective within watershed projects could be viewed as providing a platform for gender mainstreaming rather than bringing gender equality at the center stage.’ (Shah, A. et al. 2007: 23) जलसंधारण कार्यक्रमाने स्त्रियांच्या क्षमतांचा पूरेपूर उपयोग करून घेतला. पाणलोट कार्यक्रम हा जमिनीवर आधारित असल्यामुळे साहजिकच मुख्य लाभार्थी हे शेतमालक व जमिनधारकच होते. ‘Traditionally only men can own the land and hold water rights.’(Rao, B. 1999: 62) म्हणजेच वाढलेल्या पाणी साठ्यामुळे पुरूषांच्या शेतीचे उत्पादन वाढले. गावात प्रस्थापित लोकांनी विहिरी पाडल्या व स्वतःच्या शेतीला फायदा करून घेतला. नफ्याच्या रूपात होणारे उत्पादन हे प्रस्थापित पुरूषांच्या हातात पडले. स्त्रियांना व भूमिहीन शेतमजूरांना यात कुठेही आर्थिक लाभ झाला नाही. कार्यक्रमानंतर स्त्रियांना पुरूषांच्या तुलनेत कमी लाभ झाला. कार्यक्रमाने महिलांना समान सहभाग, समान वेतनाची शाश्वती दिली परंतू मिळणाऱ्या लाभात मात्र समान वाट्याची शाश्वती दिली नाही. स्त्रियांनी पुरूषांच्या बरोबरीने कार्यक्रमासाठी आपली ऊर्जा, वेळ दिला पण त्यांना पुरूषासारखे दीर्घकालीन लाभ मिळाले नाहीत. आज वाढलेल्या पाण्याचा वापर हा एक महत्वाचा मुद्दा बनला आहे. पाणलोट क्षेत्र विकासाचा फायदा फक्त नागदरवाडीलाच नाही तर रमनेवाडी, हाडोळी या शेजारिल गावांनादेखील झाला आहे. पाणी वापर व भूजल उपसा यावर कोणचेही नियंत्रण राहिले नाही त्यामुळे पाणलोट क्षेत्र विकासामुळे वाढलेल्या नैसर्गिक साधनसंपत्तीचे असमान वाटप व असमान लाभ होत आहेत. गावाच्या शाश्वत विकासाचे मुख्य उदिद्ष्ट म्हणजेच सामाजिक व आर्थिक शाश्वता असाध्य झाल्यासारखी वाटते. प्रकल्पाने पर्यावरणीय

विकास साधला आहे परंतू गावातील स्त्रिपुरूष विषमता कमी झाली नाही.

**सारांश**

गावकऱ्यांनी सामुहिकरित्या गावातील पाणी प्रश्नावर तोडगा काढला आहे. महिलांनी लोकसहभागातून जलसंधारण करून पर्यावरणाला पुर्नजीवित केले आणि गावाला नैसर्गिक संपन्नता प्राप्त करून दिली. पण वाढलेल्या पाण्यावर त्यांना हक्क मिळाले नाहित. वाढलेल्या पाण्याचा शेतमालक व जमिनधारक पुरूषांनी पुरेपुर वापर करून घेतला. वाढलेल्या पाण्याच्या वापरावर निर्बंध लादण्याची व पाण्याचे जतन व संवर्धन करण्यासाठी काही सामाजिक मापदंड बनविण्याची गरज आहे. आणि वैयक्तिक पातळीवरही पाण्याचे महत्व जाणण्याची गरज आहे. जलसंधारण कार्यक्रमांचा प्रसार व प्रचार करणे गरजेचे आहे. पाणी वापर व भूजल उपसा यावर नियंत्रण आणूण वाढलेल्या नैसर्गिक साधनसंपत्तीचे समान वाटप व समान लाभ कसे होतील याचा विचार करावा लागेल. पाणी जीवनमान उंचावण्यासाठी फायदेशीर आहे परंतू त्याहीपेक्षा महत्वाचे म्हणजे, पाणी हे जीवन जगण्यासाठी अनिवार्य आहे. त्यामुळे कोणाच्या जगण्याचा पाण्याचा हक्क नाकारून इतर कोणाच्या जीवनमान उंचावण्याऱ्या, उत्पादन वाढविणाऱ्या गरजांसाठी पाणीवापर करण्यावर निर्बंध लादणे गरजेचे आहे. म्हणजेच प्रत्येक मानवाची प्राथमिक जगण्यासाठीची गरज पूर्ण झाल्यानंतरच जीवनमान उंचावणासाठी आवश्यक असलेल्या पाण्याच्या गरजा जसे की, उद्योग, उत्पादन वाढीसाठीच्या इतर गरजांकडे लक्ष दिले पाहिजे. या कार्यक्रमांचा मुख्य हेतू पर्यावरण संरक्षण हा जरी साध्य झाला असला तरी या कार्यक्रमांच्या माध्यामातून स्थानिक वचिंत समूदायांना सबळ करण्यात यश आले नाही. पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमातील महिलांच्या सहभागाने गावाला कार्यक्रम यशस्वी करण्यात मदत झाली. नागदरवाडीतील स्त्रिशक्तिने पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमातुन गावाचा पर्यावरणीय विकास साधला. आता गावाच्या शाश्वत विकासाचे मुख्य उदिदृष्ट म्हणजेच पर्यावरणीय शाश्वतेबरोबरच सामाजिक व आर्थिक शाश्वता साध्य करण्याचेही काम पूर्ण करावे लागेल.

**संदर्भग्रंथ सुची —**

१ण आपटे, म. २०१२,याला जीवन ऐसे नाव, पाण्याची सादयांत कहाणी, पुणे, राजहंस प्रकाशन.

२ण देउळगावकर, अ. २०१२, विश्वाचे आर्त, मुंबई, लोकवाडमय ग्रह.

३ण धाराशिवकर, म. २०१३, पाणी: उदयाची दिशा चिंतन व यशोगाथेसह जलविचार, पुणे, मनोविकास प्रकाशन.

4. Danagare, D. N. (1992) 1992 Drought in Maharashtra: Misplaced priorities, mismanagement of water resources, Economic and Political Weekly, Vol.27, No. 27 (July,4, 1992)pp.1421-1425
5. Deshmukh, P. (2007). Maharashtra: Women's water project transforms village. Gender and water alliance. Second world water forum. Hague. Retrieved from www.genderandwater.org/en/gwa-products/knowledge-on-gender-and-water/articles-insource-bulletin/Maharashtra-women2019s-water-project-transforms-village-and-may-be-a-cure-for-baldness-1 on 28th November 2016.
6. D'souza, M. (1998). Watershed development: creating space for women. WOTR. Agriculture research extension network. Network paper 88. UK department for international development. Retrieved from www.wotr.org/systeam/files/articles/ws%20Development%20Creating%20Space%20for%20Women.pdf on 28th November 2016

7. Kerr, J. et al. Eds. (2002). Watershed development project in India- An evaluation. Research report 127. International food policy research institute. Washington D. C. Retrieved from www.ageconsearch.umn.edu/bitstream/16537/1/rr020127.pdf on 28th November 2016
8. Kulkarni, S. (2007). Women and water policy, Issue and alternatives. In Sumi Krishna (Eds.). *Women's livelihood rights- recasting citizenship for development*. New Delhi. Sage publication.
9. Narwani, G. S. (2005) Community Water Management, Jaipur, Rawat Publication
10. Pandit, A. (2010) Watershed Development Inputs and Social change Understanding the changing culture of child nutrition, Jaipur, Rawat Publications
11. Purandare, P. (2013) Water Governance and Droughts in Marathwada, Economic and Political Weekly, Vol. XLVIII, No. 25, June 22, 2013
12. Rao, B. (1999). Women and water in rural Maharashtra, Environment and urbanization. Sage social science collection.vol. 3. No. 2.
13. Samuel, A. et al. Watershed development in Maharashtra: Present scenario and issues for restructuring the programme. SOPPECOM. Pune. Retrieved from www.indiawaterportal.org/sites/indiawaterportal.org/files/maharashtra-watershed-forward-pdf on 28th November 2016.
14. Shah, A., et al. Eds. (2007). Impact of watershed management on women and vulnerable groups. Patancheru. Andhra Pradesh. India. ICRISAT.

RESEARCH CHRONICLER